**CNR : MHAH180025222025**

| | | | |
|---|---|---|---|
| दाखल दिनांक | २४/०३/२०२२ | | |
| नोंदणी दिनांक | २८/०३/२०२२ | | |
| निकाल दिनांक | ०९/०३/२०२६ | | |
| कालावधी | वर्ष | महिने | दिवस |
| | ०३ | ११ | १६ |

## दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, राहुरी, ता. राहुरी, जि. अहमदनगर यांच्या न्यायालयात

( पिठासन अधिकारी: मयुर ए. पवार )

**नियमित दिवाणी दावा क्र. ३४२/२०२५** **निशाणी क्र. ७८**

(जुना–नियमित दिवाणी दावा क्र. १७५/२०२२)

१. **श्री. जयसिंग माधवराव पवार**
वय : ६२ वर्षे, धंदा : शेती

२. **श्री. सुरसिंग माधवराव पवार**
वय : ६४ वर्षे, धंदा : शेती
दोघे रा. खडांबे बु.., ता. राहुरी, जि. अहमदनगर. ..वादी

**...विरूध्द...**

१. **महाराष्ट्र सरकार करीता**
**मे. जिल्हाधिकारी साहेब, अहमदनगर**

२. **तहसिलदार राहुरी** ता. राहुरी, जि. अहमदनगर

३. **मंडळाधिकारी वांबोरी**
द्वारा तहसिल कार्यालय, राहुरी,
ता. राहुरी, जि. अहमदनगर

४. **श्री. अशोक गंगाधर तमनर**
वय : ६२ वर्षे, धंदा : शेती व पेन्शनर

५. **श्री. वाल्हु गंगाधर तमनर** –मयत वारस

वय : ५९ वर्षे, धंदा : शेती

५अ. **श्रीमती. जाईबाई वाल्हु तमनर**

वय : ५३ वर्षे, धंदा : शेती व घरकाम

५ब. **राहुल वाल्हु तमनर**

वय : २६ वर्षे, धंदा : शेती

नं. ५अ व ५ब रा. धामोरी बुाा

ता. राहुरी, जि. अहमदनगर

५क. **सौ. रूपाली शिवाजी होडकर**

वय : २५ वर्षे, धंदा : घरकाम

रा. बाचकर वस्ती, उड्डाण पुलाजवळ,

पिंपरी अवघड, ता. राहुरी, जि. अहमदनगर

६. **श्री. सचिन आप्पासाहेब तमनर**

वय : ३२ वर्षे, धंदा : शेती

७. **श्री. बाळासाहेब पाराजी माने**

वय : ३८ वर्षे, धंदा : शेती व नोकरी

८. **श्री. दिपक एकनाथ माने**

वय : ३५ वर्षे, धंदा : शेती

९. **श्री. अनिल एकनाथ माने**

वय : ४० वर्षे, धंदा : शेती

१०. **श्री. गोरक्षनाथ भाऊसाहेब माने**

वय : ५५ वर्षे, धंदा : शेती

११. **श्री. संदिप सवित्रा माने**

वय : ३५ वर्षे, धंदा : शेती

१२. **श्री. गणेश सावित्रा माने**
वय : ३४ वर्षे, धंदा : शेती

१३. **सौ. शैला प्रताप पारखे**
वय : ३५ वर्षे, धंदा : शेती

१४. **श्री. सोमनाथ मंजाबापु माने**
वय : ५० वर्षे, धंदा : शेती

१५. **सुंदराबाई मंजाबापु माने**
वय : ७० वर्षे, धंदा : घरकाम

१६. **रंजना दामु गुलदगड**
वय : ४० वर्षे, धंदा : घरकाम
रा. चिखलठाण, ता. राहुरी, जि. अहमदनगर

१७. **साखरबाई भाऊसाहेब माने**
वय : ५० वर्षे, धंदा : शेती
नं. ४ ते १५, १७, रा. धामोरी बुाा, ता. राहुरी,
जि. अहमदनगर. ..**प्रतिवादी**

---

**दावा:** विनिर्दिष्ट अनुतोष अधिनियम, १९६३ चे कलम ३७ व ३८ अन्वये व दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चा आदेश ३९ अन्वये जाहिर ठराव व निरंतर ताकीद मनाई हुकुमासाठी...

---

| | |
|---|---|
| वादी तर्फे विधिज्ञ | :– श्री. व्ही. व्ही. आघाव |
| प्रतिवादी क्र. १ ते ३ तर्फे विधिज्ञ | :– श्री. जी. के. मुसळे |
| प्रतिवादी क्र. ६ तर्फे विधिज्ञ | :– श्री. एस. के. जाधव |
| प्रतिवादी क्र. ४, ५अ ते ५क, ७ ते १७ विरूध्द एकतर्फा. | |

## –: न्यायनिर्णय :–

(उदघोषित दिनांक ०९/०३/२०२६)

१. प्रस्तुतचा दावा विनिर्दिष्ट अनुतोष अधिनियम, १९६३ चे कलम ३७ व ३८ अन्वये व दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चा आदेश ३९ अन्वये जाहिर ठराव व निरंतर ताकीद मनाई हुकुमासाठी दाखल केला आहे.

**वाद मिळकतीचे वर्णन (Property Description)–**

२. अहमदनगर, उपविभाग व तालुका राहुरी, पैकी मौजे धामोरी बुाा, शिवारातील शेतजमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे–

| गट क्र. | क्षेत्र | आकार | चतु:सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | हेक्टर–आर | रु. पै. | पूर्व | दक्षिण | पश्चिम | उत्तर |
| १७४/१ | ०–८१ | ३–६० | गट क्र. १७४ पै | गट क्र. १७५/१ | गट क्र. १६९ ते १७३ | रस्ता |
| १६९/१ | १–०४ | ३–६० | १७५/१ १९२/१ | १६९/२ | कुसमुडे वस्ती ते बोरवाडी रस्ता | १७० |

**वादीची दाव्यातील हकीगत थोडक्यात खालीलप्रमाणे –**

३. वादी हे मौजे धामोरी बुाा, ता. राहुरी येथील रहिवाशी असून वादग्रस्त मिळकत ही वादी यांची वडिलोपार्जित मिळकत आहे. प्रतिवादी क्र. ४ ते १९ हे दावा मिळकतीच्या लगतचे धारक आहेत. प्रतिवादी क्र. ४ ते ६ यांच्या मालकिचे गट क्र. १३८

मध्ये जाणे येणेसाठी पुर्वापार गट क्र. १३८ च्या पश्चिम बाजुला असलेल्या गट क्र. १२९ मधुन दक्षिण बांधाने ८ ते १० फुट रूंदीचा वहिवाटीचा रस्ता उपलब्ध आहे. तरी देखील प्रतिवादी क्र. ४ ते ६ यांनी प्रतिवादी क्र. २ यांच्याकडे कलम १४३ महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम अंतर्गत वादी व प्रतिवादी क्र. ७ ते १९ यांच्याविरूध्द प्रकरण दाखल केले. तत्पूर्वी प्रतिवादी क्र. ४ ते ६ यांनी त्यांची मिळकत गट क्र. १३८ मध्ये येणे–जाणेसाठी तहसिलदार राहुरी यांच्याकडे कलम ५ मामलतदार कोर्ट ॲक्ट अन्वये रस्ता केस क्र. ३/२०२६ दाखल केली होती. सदर प्रकरणात तहसिलदार राहुरी यांनी पुर्वापार असलेल्या वहिवाटीचा रस्ता खुला करून दिला होता.

४. पुर्वापार वहिवाटीचा रस्ता उपलब्ध असतानाही प्रतिवादी क्र. ४ ते ६ यांनी प्रतिवादी क्र. २ यांच्याकडे कलम १४३ महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम अंतर्गत वादी व प्रतिवादी क्र. ७ ते १९ यांच्याविरूध्द प्रकरण दाखल केले. तत्पूर्वीही वादी प्रतिवादी यांच्यामध्ये रस्ता केस प्रकरण क्र. १९/२०१६, २०/२०१६, २१/२०१६ व ३२/२०१६ दाखल करण्यात आलेले होते. सदर प्रकरणात वादी यांच्या विरूध्द आदेश झालेला असले कारणे वादी यांनी अप्पर जिल्हाधिकारी, अहमदनगर यांच्याकडे दुसरे आर.टी.एस.अपील दाखल केलेले असून ते प्रलंबित असताना प्रतिवादी क्र. २ यांनी रस्ता केस क्र. १८/२०१६ मध्ये बेकायदेशिर निकाल पारित केला. त्याकारणे वादीने प्रस्तुतचा दावा दाखल केला.

५. प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादी क्र. ६ यांना समन्स प्राप्त झाले. प्रतिवादी क्र. ६ यांनी त्यांचे म्हणणे नि.क्र. ४२ अन्वये दाखल केलेले आहे. प्रतिवादी क्र. ६ यांनी वादीच्या दाव्यातील कथने स्पष्टपणे स्वीकारलेले आहेत.

६. प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना समन्स प्राप्त झाले. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी त्यांचे म्हणणे नि.क्र. ३२ अन्वये दाखल केलेले आहे. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी वादीच्या दाव्यातील कथने स्पष्टपणे नाकारलेले असून अधिकच्या वादोत्तरात त्यांनी असे नमुद केले की, प्रतिवादी क्र. ४ अशोक तमनर यांनी त्यांचे शेत गट क्र. १७३, १७२, १७१, १७०, १६९, १४४, १४३, १४२, १४१ व १३९ या मिळकतीच्या पुर्व बांधाने उत्तर–दक्षिण व गट क्र. १७४, १७५, १९२, १९३, १९४ व १३७ या जमिनीच्या पश्चिम बांधाने नवीन बैलगाडी रस्ता मिळावा म्हणून महाराष्ट्र जमीन महसुल संहिता १९६६ च्या कलम १४३ अन्वये दि. ०३/०९/२०१६ रोजी अर्ज दाखल केला. सदर प्रकरणात तहसिलदार यांनी स्थळनिरिक्षण पंचनामा केला. वादी व प्रतिवादी यांचे म्हणणे ऐकुन घेतले. त्यानंतर तहसलिदार यांनी रस्ता केस क्र. १८/२०१६ मध्ये प्रतिवादी क. ४ ते ६ यांच्या गट क्र. १६८ मध्ये जाण्याकरिता नवीन गाडी रस्ता मंजूर केला. प्रतिवादी क्र. २ यांनी रस्ता केस क्र. १८/२०१६ मध्ये पारीत केलेला न्यायनिर्णय हा कायदेशिर आहे. करिता वादी यांचा दावा नामंजूर करण्याची विनंती केली.

७. प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादी क्र. ४, ५अ ते ५क, ७ ते १७ यांना समन्सची बजावणी होवूनही ते प्रस्तुत प्रकरणात हजर न झाल्याने दि. १३/१२/२०२२ रोजी नि.क्र. १ खालील आदेशान्वये त्यांचेविरूध्द एकतर्फा आदेश पारित करण्यात आला.

८. वादी व प्रतिवादी यांच्या वकिलांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुत दावा व प्रतिवादींचे म्हणणे यांचे अवलोकन केले. माझे पुर्व पिठासिन अधिकारी यांनी नि. क्र. ४९ वर मुद्दे नोंदविलेले आहेत. त्या मुद्यांवरील निष्कर्ष मी खाली दिलेल्या

कारणमीमांसेत तुमुद्र केलेले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादींनी ही बाब सिध्द केली का की, प्रतिवादी क्र. २ व ३ वाद मिळकती मधुन नवीन रस्ता निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत? | ..सिध्द केले. |
| २. | वादींनी ही बाब सिध्द केली का की, प्रतिवादी हे त्यांना हरकत अडथळा करत आहेत ? | ..सिध्द केले. |
| ३. | वादींनी ही बाब सिध्द केली आहे का की, प्रतिवादी क्र. २ यांनी रस्ता केस क्र.१८/२०१६ मध्ये पारीत केलेला आदेश बेकायदेशीर आहे ? | सिध्द केले. |
| ४. | वादी हे जाहिर ठरावाचा आदेश मिळविण्यास पात्र आहेत काय? | होकारार्थी. |
| ५. | वादी हे निरंतर ताकीद मनाई हुकुमाचा आदेश मिळविण्यास पात्र आहेत काय? | होकारार्थी. |
| ६. | काय आदेश आणि हुकूमनामा? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

९. वादीतर्फे वादी क्र. १ जयसिंग माधवराव पवार यांनी स्वत:ला निशाणी क्र. ५० अन्वये तपासले आहे.

१०. वादी यांनी त्यांचा दावा सिध्द करण्यासाठी निशाणी क्र. ३ सोबत खालील प्रमाणे दस्ताऐवज दाखल केलेले आहेत:

| अ.क्र. | कागदपत्रांचा तपशिल | नि.क्र. |
|---|---|---|
| १. | धामोरी बुाा येथील गट क्र. १७४/१ चा ७/१२ उतारा | ३/१ |
| २. | धामोरी बुाा येथील गट क्र. १६९/१ चा ७/१२ उतारा | ३/२ |
| ३. | धामोरी बुाा येथील गट क्र. १३८/१ चा ७/१२ उतारा | ३/३ |
| ४. | रस्ता केस क्र. १८/२०१६ मधील निकालाची प्रत | ६५ |
| ५. | रस्ता केस क्र. ३/२०१६ मधील निकालाची प्रत | ३/५ |
| ६. | रस्ता के. १८/२०१६ मधील स्थळनिरिक्षण पंचनामा | ३/६, ३/७ |
| ७. | धामोरी बुाा येथील गाव नकाशा | ३/८ |
| ८. | नोंदणीकृत खरेदीखत क्र. २५८९/२०१९ व २३७७/२०२१ ची छायांकित प्रत | ३/९ |

११. प्रतिवादी क्र. १ ते ३ करीता त्यांनी सा.क्र. १ तेलपाल बन्सी शिंदे यांची साक्ष नि.क्र. ६४ वर नोंदवली आहे. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी पुरसिस नि.क्र. ६९ अन्वये त्यांचा पुरावा बंद केला. प्रतिवादी क्र. ६ यांनी पुरसिस नि.क्र. ५९ अन्वये त्यांचा पुरावा बंद केला.

**वादी यांचा पुरावा–**

१२. वादीतर्फे वादी क्र. १ जयसिंग माधवराव पवार यांनी स्वत:ला निशाणी क्र. ५० अन्वये तपासले आहे. सदर साक्षीदार यांनी त्यांच्या सरतपासात असे कथन

केले की, वादी हे मौजे धामोरी बुा, ता. राहुरी येथील रहिवाशी असून वादग्रस्त मिळकत ही वादी यांची वडिलोपार्जित मिळकत आहे. प्रतिवादी क्र. ४ ते १९ हे दावा मिळकतीच्या लगतचे धारक आहेत. प्रतिवादी क्र. ४ ते ६ यांच्या मालकिचे गट क्र. १३८ मध्ये जाणे येणेसाठी पुर्वापार गट क्र. १३८ च्या पश्चिम बाजुला असलेल्या गट क्र. १२९ मधुन दक्षिण बांधाने ८ ते १० फुट रूंदीचा वहिवाटीचा रस्ता उपलब्ध आहे. तरी देखील प्रतिवादी क्र. ४ ते ६ यांनी प्रतिवादी क्र. २ यांच्याकडे कलम १४३ महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम अंतर्गत वादी व प्रतिवादी क्र. ७ ते १९ यांच्याविरूध्द प्रकरण दाखल केले. तत्पूर्वी प्रतिवादी क्र. ४ ते ६ यांनी त्यांची मिळकत गट क्र. १३८ मध्ये येणेजाणेसाठी तहसिलदार राहुरी यांच्याकडे कलम ५ मामलतदार कोर्ट ॲक्ट अन्वये रस्ता केस क्र. ३/२०२६ दाखल केली होती. सदर प्रकरणात तहसिलदार राहुरी यांनी पुर्वापार असलेल्या वहिवाटीचा रस्ता खुला करून दिला होता.

१३. पुर्वापार वहिवाटीचा रस्ता उपलब्ध असतानाही प्रतिवादी क्र. ४ ते ६ यांनी प्रतिवादी क्र. २ यांच्याकडे कलम १४३ महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम अंतर्गत वादी व प्रतिवादी क्र. ७ ते १९ यांच्याविरूध्द प्रकरण दाखल केले. तत्पूर्वीही वादी प्रतिवादी यांच्यामध्ये रस्ता केस प्रकरण क्र. १९/२०१६, २०/२०१६, २१/२०१६ व ३२/२०१६ दाखल करण्यात आलेले होते. सदर प्रकरणात वादी यांच्या विरूध्द आदेश झालेला असले कारणे वादी यांनी अप्पर जिल्हाधिकारी, अहमदनगर यांच्याकडे दुसरे आर.टी.एस.अपील दाखल केलेले असून ते प्रलंबित असताना प्रतिवादी क्र. २ यांनी रस्ता केस क्र. १८/२०१६ मध्ये बेकायदेशिर निकाल पारित केला.

१४. सदर साक्षीदार त्यांच्या उलटतपासात मान्य करतात की, रस्त्याच्या बाबतीत ब–याच अर्जदारांनी वेगवेगळे प्रकरण तहसिलदार राहुरी यांच्याकडे दाखल केलेले आहेत. सदर साक्षीदार हे ही मान्य करतात की, रस्ता केस क्र. १८/२०१६ मध्ये तहसिलदार यांनी रस्ता हा शेताच्या कडेने मंजूर केलेला आहे. तसेच तहसिलदार यांच्या आदेशाविरूध्द अप्पर जिल्हाधिकारी यांच्याकडे अपील दाखल केले होते. सदरचे अपील त्यांनी नामंजूर केलेले आहे. इतर उत्तर सुचक प्रश्नांना सदर साक्षीदार यांनी नकारार्थी उत्तरे दिली.

**<u>प्रतिवादी यांचा पुरावा –</u>**

१५. प्रतिवादी क्र. १ ते ३ तर्फे सा.क्र. १ तेजपाल बन्सी शिंदे यांनी स्वत:ला नि.क्र. ६४ अन्वये तपासले. सदर साक्षीदार यांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, प्रतिवादी क्र. ४ अशोक तमनर यांनी त्यांचे शेत गट क्र. १७३, १७२, १७१, १७०, १६९, १४४, १४३, १४२, १४१ व १३९ या मिळकतीच्या पुर्व बांधाने उत्तर–दक्षिण व गट क्र. १७४, १७५, १९२, १९३, १९४ व १३७ या जमिनीच्या पश्चिम बांधाने नवीन बैलगाडी रस्ता मिळावा म्हणून महाराष्ट्र जमीन महसुल संहिता १९६६ च्या कलम १४३ अन्वये दि. ०३/०९/२०१६ रोजी अर्ज दाखल केला. सदर प्रकरणात तहसिलदार यांनी स्थळनिरिक्षण पंचनामा केला. वादी व प्रतिवादी यांचे म्हणणे ऐकुन घेतले. त्यानंतर तहसलिदार यांनी रस्ता केस क्र. १८/२०१६ मध्ये प्रतिवादी क. ४ ते ६ यांच्या गट क्र. १६८ मध्ये जाण्याकरिता नवीन गाडी रस्ता मंजूर केला. प्रतिवादी क्र. २ यांनी रस्ता केस क्र. १८/२०१६ मध्ये पारीत केलेला न्यायनिर्णय हा कायदेशिर आहे.

१६. सदर साक्षीदार त्यांच्या उलटतपासात मान्य करतात की, बांधावर झाडे, विद्युत पोल आढळल्यास त्या बांधावरून रस्ता दिला जात नाही. तसेच सदर साक्षीदार त्यांच्या उलटतपासात मान्य करतात की, दि. ०७/१२/२०१६ रोजी झालेल्या स्थळनिरिक्षण पंचनाम्यात प्रतिवादी क्र. ४ अशोक तमनर यांनी रस्त्याची मागणी केलेले क्षेत्र हे १२०० ते १३०० फुट अंतरावर असून प्रतिवादी क्र. ४ यांना ओढयालगत १५० ते २०० फुट अंतरावर गाडी रस्ता असल्याचे निदर्शनास येते. तसेच प्रतिवादी यांच्या शेतजमीनी या बारामाही बागायती असून रस्त्या अभावी त्यांच्या जमिनी लॅन्डलॉक झाल्याबद्दल स्थळपंचनाम्यात नमुद नाही. तसेच पहिला रस्ता उपलब्ध असेल तर नवीन रस्ता दिला जात नसल्याचेही सदर साक्षीदार मान्य करतात. इतर उत्तर सुचक प्रश्नांना सदर साक्षीदार यांनी नकारार्थी उत्तरे दिली.

**<u>मुद्दा क्र. ३ करीता:</u>**

१७. मुद्दा क्र. १ च्या अनुषंगाने वादी यांनी हे सिध्द करणे आवश्यक आहे की, प्रतिवादी क्र. २ यांनी रस्ता केस क्र. १८/२०१६ मध्ये दि. २५/११/२०२१ रोजी बेकायदेशिर व चुकिचा आदेश पारित केला. वादी यांचे विधीज्ञ यांनी असा युक्तिवाद केला की, प्रतिवादी क्र. ४ ते ६ यांना त्यांचा गट क्र. १३८ मध्ये जाण्याकरिता गट क्र. १७३, १७२, १७०, १६९, १३९ ते १४३ च्या पश्चिम बांधाने दक्षिणोत्तर असा पुर्वापार वहिवाटीचा रस्ता उपलब्ध होता. प्रतिवादी क्र. २ यांनी रस्ता केस क्र. १८/२०१६ मध्ये प्रतिवादी क्र. ४ ते ६ यांना पुर्वापार रस्ता उपलब्ध असताना कलम १४३ महाराष्ट्र जमीन महसुल संहिता अन्वये नवीन रस्ता दिला. करिता प्रतिवादी क्र. २ यांनी पारित केलेला आदेश हा बेकायदेशिर आहे.

१८. याउलट, प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचे विधीज्ञ यांनी असा युक्तिवाद केला की, रसता केस क्र. १८/२०१६ मधील न्यायनिर्णय हा प्रतिवादी क्र. २ यांनी न्यायसंगत पारित केलेला आहे.

१९. वादी प्रतिवादी यांचा युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, अर्जदार नामे बेबी पटारे यांनी कुसुम पांढरे व इतर यांच्याविरूध्द मामलतदार कोर्ट अधिनियम १९६६ चे कलम ५(२) अन्वये रस्ता केस क्र. ३/२०१६ दाखल केली होती. सदर रस्ता केसमध्ये तहसिलदार राहुरी यांनी गट क्र. १२९ व १३८ च्या दक्षिण बाजुने उपलब्ध असलेला पुर्वापार वहिवाटीचा पश्चिम–पुर्व रस्ता हा खुला केला होता. सदर रस्ताअन्वये प्रतिवादी क्र. ४ ते ६ यांना त्यांचे गट क्र. १३८ मध्ये जाण्याकरिता रस्ता उपलब्ध आहे. रस्ता केस क्र. ३/२०१६ मधील न्यायनिर्णय हा तहसिलदार यांनी दि. १२/०९/२०१६ रोजी पारित केलेला असून तद्नंतर प्रतिवादी क्र. ४ ते ६ यांनी प्रस्तुत वादी यांच्याविरूध्द दि. ०३/०९/२०१६ रोजी प्रस्तुत रस्ता केस क्र. १८/२०१६ कलम १४३ महाराष्ट्र जमीन महसुल संहिता अन्वये दाखल केला. कलम १४३ महाराष्ट्र जमीन महसुल संहिता १९६६ अन्वये जर एखाद्या जमिनीत जाण्यासाठी रस्ता उपलब्ध नसेल तर तहसिलदार हे नवीन रस्ता देवू शकतात. परंतु प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादी क्र. ४ ते ६ यांना रस्ता केस क्र. ३/२०१६ चे अवलोकन केले असता असे निदर्शनस येते की, प्रतिवादी क्र. ४ ते ६ यांना त्यांचा गट क्र. १३८ मध्ये जाण्याकरिता गट क्र. १७३, १७२, १७०, १६९, १३९ ते १४३ च्या पश्चिम बांधाने दक्षिणोत्तर असा पुर्वापार वहिवाटीचा रस्ता उपलब्ध आहे. जर पुर्वापार वहिवाटीचा रस्ता असेल तर कलम १४३ अंतर्गत नवीन रस्ता तहसिलदार यांनी मंजुर करणे बेकायदेशिर ठरते. तसेच रस्ता केस क्र. १८/२०१६ मध्ये स्थळनिरिक्षण

पंचनाम्याचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, प्रतिवादी यांच्या जमिनीमध्ये पिक उभे असून ते लॅण्डलॉक झालेल्या नाहीत. करिता रस्ता केस क्र. १८/२०१६ मध्ये तहसिलदार यांनी दिलेला निर्णय बेकायदेशिर ठरतो. करिता, मी मुद्दा क्र. ३ चा निष्कर्ष सिध्द केले असा देत आहे.

**मुद्दा क्र. १ व २ करीता:**

२०. मुद्दा क्र. ३ च्या उत्तराअन्वये असे निदर्शनास येते की, प्रतिवादी क्र. २ यांनी रस्ता केस क्र. १८/२०१६ मध्ये पारित केलेला निर्णय हा चुकिचा व बेकायदेशिर असून सदर निर्णयाचा आधार घेवून प्रतिवादी क्र. ३, ४ ते ६ यांनी वादग्रस्त मिळकतीतून नवीन रस्ता तयार करण्याचा प्रयत्न करून वादी यांच्या वहिवाटीस हरकत अडथळा केला. करिता, मुद्दा क्र. १ व २ चे उत्तर मी सिध्द केले असा देत आहे.

**मुद्दे क्र. ४ व ५ करीता:**

२१. मुद्दा क्र. १ ते ३ च्या उत्तराच्या अनुषंगाने, प्रतिवादी क्र. २ यांनी रस्ता केस क्र. १८/२०१६ मध्ये पारित केलेला निर्णय हा चुकिचा व बेकायदेशिर असून सदर निर्णयाचा आधार घेवून प्रतिवादी क्र. ३, ४ ते ६ यांनी वादग्रस्त मिळकतीतून नवीन रस्ता तयार करण्याचा प्रयत्न करून वादी यांच्या वहिवाटीस हरकत अडथळा केला, ही बाब सिध्द होत असल्याकारणे वादी हे प्रतिवादी क्र. २ यांनी रस्ता केस क्र. १८/२०१६ मध्ये दिलेला निर्णय हा चुकिचा व बेकायदेशिर आहे असा ठराव व निरंतर मनाई हुकुमाच्या आदेशास पात्र ठरतात. करिता, मुद्दा क्र. ४ व ५ चे उत्तर मी होकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्र. ६ करिता–**

२२. मुद्दे क्र. १ ते ५ ची उत्तराच्या अनुषंगाने, मी मुद्दा क्र. ६ चे उत्तर नोंदविण्याकरिता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**– आ दे श –**

१) वादीचा दावा खर्चासह मंजुर करण्यात येत आहे.

२) प्रतिवादी क्र. २ यांनी रस्ता केस क्र. १८/२०१६ मध्ये दिलेला निर्णय हा चुकिचा व बेकायदेशिर असल्याचे घोषीत करण्यात येते.

३) प्रतिवादी क्र. १ ते १७ यांना वादी यांच्या वादग्रस्त मिळकतीत रस्ता केस क्र. १८/२०१६ च्या बेकायदेशिर निर्णयाच्या आधारे हरकत अडथळा करण्यास कायमस्वरूपी मनाई आदेश करण्यात येतो.

४) येणेप्रमाणे हुकुमनामा करण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात निवेदित व अधिघोषित केले.)

MAYUR EKNATHRAO PAWAR

Digitally signed by MAYUR EKNATHRAO PAWAR
Date: 2026.03.10 14:54:43 +0530

**( मयुर ए. पवार )**

दिनांक:–०९/०३/२०२६.

दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
ता. राहुरी, जि. अहमदनगर.